P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - २२/१२/२०२२

## दि.२१/१२/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड १०७५/२०२२ भा.द.वि.कलम ३९४,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१९/१२/२०२२ रोजी १६/३० वा. पासुन ते १८/३० वा. दरम्यान कुणाल हॉटेल मागे गल्लीत, महर्षि स्कुल जवळ, काळेवाडी, पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२१.१२.२०२२ रोजी २२.५४ वा

फिर्यादी :- अरविंद कुमार रामजीयावन त्रीपाठी, वय ३० वर्षे, धंदा व्यवसाय, रा. दत्ता काटे यांचे घरात भाड्याने, लेन नं. ५, दगडु पाटील नगर, थेरगांव, पुणे.

आरोपी :- पवन जाधव व इतर ०२
आरोपी अटक नाही

तपशिल :- यातील फिर्यादी हे फेरीवाला म्हणुन मिक्सर दुरुस्तीचे काम करत असतात. वर नमुद तारीख वेळी व ठिकणी मीक्सर दुरुस्तीकामी फिरत असतांना यातील आरोपी पवन जाधव नाव सांगणारा मुलगा याने त्यास " माझे नाव पवन जाधव आहे. मी इथला दादा आहे. माझ्या एरीयामध्ये धंदा करायचा तर मला हफ्ता दिला पाहिजे" असे म्हणुन त्याचे दोन मित्रांसह फिर्यादीस धमकावुन, मारहाण करुन फिर्यादी कडील ६५००/- रुपये रोख काढुन घेतले तसेच फिर्यादीचे मोबाईलचे फोन पे ॲपचा पीन क्रमांक घेवुन ६०००/- रुपये ठिक-ठिकाणी स्कॅन करुन बळजबरीने खरेदी करुन पळुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि लोहार ९८५०२२३१९०

२.

पोस्टे व गु.रजि.नं. :- भोसरी १०४२/२०२२ भा.द.वि.कलम ३५४, ३५४ (अ), ३५४(ब) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२१/१२/२०२२ रोजी १६/१५ वा.चे सुमारास पांडुनगरकॉलनीनं. २ चक्रपाणी वसाहत भोसरी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२१/१२/२०२२ वेळ २३.३६ वा

फिर्यादी :- महीला फिर्यादी वय-४५ वर्षे

आरोपी :- संजय माने, रा. पांडुनगरकॉलनीनं. २ चक्रपाणी वसाहत भोसरी पुणे
**आरोपी ताब्यात आहे**

तपशिल :- वर नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांची मुलगी राधा हीला पाहण्यासाठी मुलीचा मित्र सार्थक संजय माने, रा. पांडु नगर कॉलनी नं. २ चक्रपाणी वसाहत भोसरी पुणे याचे घरी आले असताना फिर्यादीचे मुलीचा मित्र सार्थक याचे वडील संजय माने, रा. सदर यांनी फिर्यादी यांचे जवळ जावुन तुम्हाला मी ३०००/- रुपये देतो फक्त माझ्या सोबत एकदा झोपा असे बोलुन त्यांना नग्न करण्याचे हेतुने त्यांचे साडीचा पदर ओढुन त्यांचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पवार ९५५२५८०५२६

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण १९३७/२०२२ भादवि का क ३२४, ३२३, ५०४, ५०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी रात्रौ ०९/०० वा.सुमारास गुप्ता बिल्डींगचे खाली पत्राशेडचे बाजूला चाकण ता.खेड जि.पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/१२/२०२२ रोजी ०२/३६ वा |
| फिर्यादी | :- | विजय सत नारायण यादव वय ३५ वर्षे धंदा-फिटर. रा.गुप्ता बिल्डींग,चक्रेश्वर रोड, चाकण ता.खेड जि.पुणे |
| आरोपी | :- | १.दिपक दुलाल बिसास वय ३८ वर्षे<br>२.बिस्वजीत लेटनिर्मल दास वय ५२ वर्षे दोन्ही रा.गुप्ता बिल्डींग यांचे बांधकमा साईटवर चाकण ता.खेड जि.पुणे. व त्याचा मित्र पुर्ण नाव पत्ता माहीत नाही.<br>**आरोपी क्र.१ व २ अटक आहेत** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीची पत्नी असे स्वयंपाक करत असताना आमच्यात बाचाबाची झाली असताना, आरोपी क्र.१ याने फिर्यादीला आवाज देवून विचारले कशा वरून भांडणे झाली. तेव्हा आरोपी क्र.१ व त्याचा मित्र पुर्ण नाव पत्ता माहीत नाही व आरोपी क्र.२ यानी फिर्यादीला घरा बाहेर नेऊन आरोपी क्र.१ याने फिर्यादीला पाठीमागुन पकडून धरले व आरोपी क्र.२ व आरोपी क्र.१ याचा मित्र याने फिर्यादीला हातापायाने मारहाण करून तेथे पडलेला लोखंडी रॉड डोक्यात, हातावर मारून जखमी केले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा हांडे ९९२२६६५५४७ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड १०७४/२०२२ भादवि कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी सकाळी ११/०० वा.चे सुमारास राहते घरी फ्लॅट नं.ई/१२०३, सोनिक्स टॉवर, वाकड, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/१२/२०२२ रोजी २२.१२ वा |
| फिर्यादी | :- | मधुकर लक्ष्मण इंगोले वय-६० वर्षे धंदा-सेवानिवृत्त रा.सध्या- रा.फ्लॅट नं.ई/१२०३, सोनिक्स टॉवर, वाकड,पुणे |
| आरोपी | :- | १)सचिन मधुकर इंगोले वय-३५ वर्षे रा.सदर<br>२) महीला आरोपी वय-५५ वर्षे रा.सदर<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांची पत्नी व मुलगा नामे सचिन असे सर्वजण राहते घरी असताना पैसे व गावाकडील शेतजमीन हे आमचे नावावर करा नाहीतर आम्ही तुम्हांला संपवितो अशी धमकी फिर्यादीला देऊन फिर्यादीचा मुलगा सचिन व पत्नी यांनी शिवीगाळ करीत हाताने मारहाण करुन मुलगा सचिन याने पडदयाला वापरण्यात येणारे स्टीलच्या पाईपने व चाकुने मारहाण करुन डोक्याला व शरिरावर गंभीर स्वरुपाची दुखापत करुन फिर्यादीचे पत्नीने फिर्यादी यांचे गुप्तांग पकडुन हाताने पिरगळले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि दिवटे ८६०५१५७१५७ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण १९४०/२०२२ भादवी का क २७९,३३७,मो वा का क १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/१२/ २०२२ रोजी १३/०० वाजता चे सुमारास माणिक चौकात चाकण ता खेड जि पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/१२/२०२२ रोजी २२.०७ वा |

फिर्यादी :- महीला फिर्यादी वय-५८ वर्षे

आरोपी :- सचिन रोहिदास आडे वय २२ वर्ष राहणार पानसरे मळा चाकण तालुका खेड जिल्हा पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या रांजणगाव येथून निघून नेरूळ येथे जाण्यासाठी बसने चाकण माणिक चौक येथे १३.०० वा उतरून चाकण बसस्थानकाकडे जाण्यासाठी फिर्यादीचे ताब्यातील बॅग घेऊन पायी रस्ता क्रॉस करीत असताना शिक्रापूर रोड कडून तळेगाव चौकाकडे जाणारे पाण्याच्या टँकर फिर्यादी समोर अचानक आला त्याचा फिर्यादीला धक्का लागल्याने फिर्यादी डावे खांद्यावर खाली रोडवर पडले त्यावेळी फिर्यादीचे डावे खांद्याला व कमरेला मुका मार लागून दुखापत झाली त्यानंतर तेथे जमलेल्या लोकांच्या मदतीने फिर्यादीला आस्था हॉस्पिटल येथे उपचार कामी आणले आहे मला धडक देऊन अपघात करणा-या टँकरचे नंबर एम एच १४ डीएम ८२ ८३ असा आहे

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ बुरुड ९७६३६६९२७४

६.

पोस्टे व गु.रजि.नं. :- दिघी ५४९/२०२२ भा.द.वि.स.कलम,३८०,४५७ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/१२/२०२२ रोजी पहाटे०१/०० चे दरम्यान ममता चौकाचे जवळ,विशाल नगरी सोसयटी,फ्लॅट न.बी. व्हिंग ३०३,ता.हवेली जि.पुणे,विजयनगर दिघी

गुन्हा दाखल :- दि.२१/१२/२०२२ रोजी ०१/०२ वा

फिर्यादी :- सतेंद्रप्रताप गुलाबचंद्र विश्वकर्मा वय-३६ धंदा-नोकरी रा.हाउस न.१४८३/३ सी ओल्ड दिल्ली रोड,राजीवनगर,एव्हीआर पब्लीक स्कुल गुरग्राम,राज्य हरियाना

आरोपी :- अज्ञात आरोपी

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे २,२६,७२०/- रूपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व ४८,०००/- रूपये रोख असे एकुण २,७४,७२०/- रूपये किंमतीचे दागिने व रोख रक्कम हि कोणीतरी अज्ञात इसमाने घराचे आत प्रवेश करुण आमचे संमती शिवाय मुद्दाम लबाडीच्या इराद्याने स्वतःचे फायद्याकरीता चोरून नेले आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि शिखरे ८८५५०४७६९५

७.

पोस्टे व गु.रजि.नं. :- शिरगाव ११६/२०२२ भादवि कलम ३७९ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१९/१२/२०२२ रोजी १३.३० वा.चे सु विशाल नहार यांच्या रेसीडेन्सीयल एकराच्या ईडन नावाच्या साईटवर मौजे चांदखेड,ता.मावळ,जि
.पुणे

गुन्हा दाखल :- दि.२१/१२/२०२२ रोजी २२/०२ वा

फिर्यादी :- रविंद्र बबन शिंदे वय ५४ वर्षे व्यवसाय-नोकरी रा.चांदखेड ता.मावळ जि.पुणे मो.नं.७६२०३८३८६९

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची ३५,०००/- रू किंमतीची होंडा कंपणीची पांढ-या रंगाची अॅक्टीव्हा मोडेलची गाडी नं एम एच १४ जे डी ४२५३ ही नमुद ठिकाणी लॉक व पार्क करुन ठेवली असता ती कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय चोरुन नेली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा दांडेकर ९३२६१५४०९२

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १२३६/२०२२ भा.द.वि.कलम ३८१ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ऑगस्ट २०२२ चे अखेर पासूनते नोंव्हेंबर २०२२ ची अखेर पर्यंतचेदरम्यान फ्लिपकार्टकंपनीचे मारूंजी, पुणे येथील ब्रँच येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१/१२/२०२२ रोजी १८.५२ वा. |
| फिर्यादी | :- | राजेश ओमेनकुट्टन, वय ३४ वर्षे, रा. आयोध्यानिवास, ६/२ए, जयमाला नगर, लेननं. २, ओल्ड सांगवी, पुणे, |
| आरोपी | :- | १)सचीन संजय मोरे वय ३० वर्ष रा ए ३, फलॅट नं ६१३, एक्झर्बाया सोसा, नेरे दत्तवाडी ता मूळशी जि पुणे<br>२)राजू बिरेंद्रकूमार गूप्ता वय ४६ वर्ष रा रमेश भोयर याचे रूममध्ये भोईरवाडी फेज ३ पूणे<br>३)म्यानदेव विजयकूमार ढवळे वय २१ वर्ष रा रत्नदिप कॉलनी, संभाजी यांचे रूममध्ये डांगे चौक वाकड पूणे<br>४)हर्ष केशव वर्मा वय २४ वर्ष रा एस के कूमार यांची रूम, विप्रो सर्कल फेज २ हिंजवडी पूणे<br>**आरोपी अटक आहेत** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी यांनी ४१२६८६/- रु की चे वेगवेगळया कंपनीचे व मॉडेलचे मोबाईल फोन हे ऑगस्ट २०२२ चे अखेर पासून ते नोंव्हेंबर २०२२ ची अखेर पर्यंतचे दरम्यान फ्लिपकार्ट कंपनीचे मारूंजी, पुणे येथील ब्रँच मधुन आमचे कडील असलेल्या या चार डिलीव्हरी बॉय यांनी कंपनीचे संमती शिवाय लबाडीचे इराद्याने चोरून नेले आहेत म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि काटे ७७२२०४६१०० |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ६९०/२०२२ भादवि कलम ३६३ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी १६.३० वाजता चे सुमारास मोरवस्ती चिखली ता.हवेली जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२१.१२.२०२२ रोजी २०/२० वा |
| फिर्यादी | :- | श्री. युवराज किसण इंगळे वय ४२ वर्षे धंदा.नोकरी रा.संतोष राऊत यांचे भाडयाचे खोलीत टावर लाईन अंगनवाडी रोड सहयाद्री सोसा नं २ मोरवस्ती चिखली ता.हवेली जि.पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची मुलगी वय १६ वर्षे ५ महिणे हीस कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी आमिष दाखवुन फुस लावुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि कुमटकर ९५५२५३६४३२ |